दैनिक

अन्यायाचा प्रतिकार — महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनिल पोतदार

• वर्ष १५ वे • अंक ३४६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरूवार दि.११ मार्च २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com







# नाक दाबले की तोंड उघडते या म्हणीप्रमाणे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचा शिवभोजन चालकांचा नाक दाबण्याचा प्रयत्न

**भाग ३**

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यातील १०७ शिवभोजन केंद्रांची बिले गेल्या सहा महिन्यांपासून मिळालेली नसताना कोरोनाचे निमित्त करून शिवभोजन केंद्र चालकांची अडवणूक करण्याचा प्रयत्न जाणूनबुजून जिल्हा पुरवठा अधिकारी करीत आहेत. त्यामुळे एक तर राज्य शासनाला बदनाम करण्याचा कट असावा अथवा आर्थिक काही हेतू असावा असा संशय शिवभोजन चालकांमधून व्यक्त केला जात आहे. म्हणूनच शिवभोजन चालकांचे नाक दाबून खिशात हात घालण्याचा प्रयत्न तर नसावा ना असा मतप्रवाह शिवभोजन चालकांमध्ये निर्माण झाला आहे.

रायगड जिल्ह्यातील १०७ शिवभोजन केंद्रांना बिलासाठी वेठीस धरून कधी कोरोनाचे निमित्त करून, कधी आपल्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बदनाम करून शिवभोजन चालकांची बिले तंगविण्याच्या हा प्रकार असावा जेणेकरून शिवभोजन चालकांकडून काही आर्थिक मलिदा मिळतोय काय? हा आजमवण्याचा प्रकार असावा अथवा जिल्हा पुरवठा अधिकारी हे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात रुजू झाल्यामुळे ते भाजपचे हस्तक म्हणून तर काम करीत नाही ना? त्यामागे त्यांचा हेतू असा असावा जर शिवभोजन केंद्रांची बिले वेळेवर दिली गेली नाहीत तर शिवभोजन केंद्रे चालवियास शिवभोजन केंद्र चालक असमर्थता दर्शवतील आणि त्यामुळे केंद्रे बंद झाल्यावर महाविकास आघाडीचा गरीबांना ५ रुपयांमध्ये एक वेळ भोजन देण्याचा उपक्रम मातीमोल होईल व हे सरकार बदनाम होईल असे कटकारस्थान असल्याचा संशय शिवभोजन चालकांमधून व्यक्त केला जात आहे.

**मंगळवार दि.१६ मार्च २०२१ च्या अंकात जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचा विशेष स्फोट**

## संक्षिप्त...

### आज कोरोनाच्या तब्बल १३ हजारांवर नवीन रुग्णांची भर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई: राज्यात कोरोनाचा पुन्हा एकदा उद्रेक झाल्याचे पाहायला मिळत आहे. गेल्या २४ तासांत तब्बल १३ हजार ६५९ नवीन रुग्णांचे निदान झाले आहे तर ९ हजार ९१३ रुग्ण करोनावर मात करून घरी परतले आहेत. आज ५४ करोनामृत्यूंची नोंद झाली असून ॲक्टिव्ह रुग्णांचा आकडा लाखाच्या उंबरठ्यावर पोहचला आहे. राज्यासाठी हे खूप मोठ्या धोक्याचे संकेत मानले जात आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आजच राज्यातील करोना स्थितीवर चिंता व्यक्त केली आहे. सरकारची पुन्हा लॉकडाऊन लावण्याची इच्छा नाही मात्र नागरिकांनी करोनाचे नियम काटेकोरपणे पाळले पाहिजेत, असे विधान करत मुख्यमंत्र्यांनी एकप्रकारे सूचक इशाराच दिलेला आहे. असे असतानाच आजची आकडेवारी हाती आली असून त्यातील आकडे काळजीत भर टाकणारे ठरले आहेत. राज्यात आज गेल्या काही महिन्यांतील सर्वाधिक रुग्णवाढ पाहायला मिळाली आहे. २४ तासांत तब्बल १३ हजारांवर नवीन बाधितांची भर पडली आहे.

## अलिबाग सार्वजनिक बांधकाम कार्यालयाची दयनिय अवस्था

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**



पनवेल : विकासाचा महामेरू हे ख्याती असलेले सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अलिबाग कार्यालयाची अत्यंत दयनीय अवस्था पाहता हे जिल्हास्तरीय कार्यालय आहे? असा आत प्रवेश करताच सर्व सामान्य नागरिकांना प्रश्न पडल्याशिवाय रहातच नाही.

रायगड जिल्ह्यातील अनेक शासकिय कार्यालये अलिबाग येथे आहेत परंतु सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयाची अवस्था पह-णारे थक्कच होतात या कार्यालयातील महत्वाची कागदपत्राची कपाटे अक्षरशः पुर्ण गंजलेल्या अवस्थेत आहेत, तर काही कपाटे कार्यालयाच्या परीसरात विखुरली आहेत कार्यालयाच्या मागील शेड वरील सिमेंट पत्र्याचे फक्त तुकडेच उरलेले आहेत, तर मागील दरवाज्यात खालच्या लादीवर महत्वाची कागदपत्र फाईल व इतर सामान अन्य कापडात बांधुन जाण्या येण्याच्या रस्त्यातच ठेवले आहे विविध अधिकारी व कर्मचारी यांना कामकाज हाताळण्याकरीता जी टेबले व खुर्च्या आहेत त्यांच्यावर कधी कपड्याचा हात स्वच्छतेकरीता मारला जातो कि नाही हे पाहुन नक्कीच आश्चर्याचा धक्का बसतो.मागील दुसरे डाव्या हाताचे प्रवेशद्वारा जवळच एक सांड पाण्याकरीता गटार आहे त्याहती घाण साचलेली असल्याने त्याचीही अनेक महीने सफाई झाली की नाही हे ही पहाताक्षणी जाणवते तर पाणी पिण्याकरीता कुलरही शेवटची घटका मोजतोय का? हा विचार मनात सर्व सामान्य नागरीकांना पडल्याखेरीज रहात नाही, कार्यालयाच्या खिडक्यांची तावदाने निखळली आहेत कार्यालयाच्या मागील बाजुस लाकडाचे ओंडके कापलेल्या अवस्थेत अस्ताव्यस्त पडलेले आहेत भंगारात टाकलेल्या लोखंडी सळ्या,गंजलेल्या अवस्थेत पडलेल्या आहेत कार्यालय आत व परिसरात स्वच्छतेचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र पहाताना वाटते की लाखो करोडोची विकासकाची निविदा प्रणाली राबविणारी ही शासकिय यंत्रणा स्वतःचे कार्यालय अशा अवस्थेत का बरे ठेवते? या बाबत सार्वजनिक बांधकाम खात्याचे वरीष्ठ अभियंता यांच्याशी संबंधित कार्यालय विषयक चर्चा करण्याकरीता प्रत्यक्ष भेट घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांची भेट होऊ शकली नाही.



रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कुल व ज्युनिअर कॉलेज आणि लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक सीबीएसई बोर्ड स्कुल येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. (छाया- जे. अमित)

## आसूडगाव बस स्थानकाजवळ सराईत गुन्हेगाराला अग्निशस्त्रासह केली अटक

**तळोजा कारागृहातुन सुटकेनंतर आरोपी अग्निशस्त्रासह येणार असल्याची पोलिसांनी मिळाली माहिती**

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अभिलेखा वरील सराईत गुन्हेगार विनोदकुमार राजभर (वय ३५) जानेवारी २०२० मध्ये एक वर्ष शिक्षा भोगून तळोजा कारागृहातून सुटला आहे. सदरचा आरोपी आज (१० मार्च) पनवेल परिसरातील आसुडगाव बस स्थानकाजवळ अग्निशस्त्रासह येणार असल्याची खात्रीशीर बातमी गुन्हे शाखा कक्ष-२ पनवेल चे पोलीस उपनिरीक्षक वैभव रोंगे यांना मिळाली. त्या अनुषंगाने नवी मुंबई गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्त डॉ. शेखर पाटिल, गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त प्रवीण पाटिल, गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-२ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस उपनिरीक्षक वैभव रोंगे, पोहवा अनिल पाटिल, साळुंखे, रणजित पाटिल, प्रमोद पाटिल, पो-लीस नाईक डोंगरे, प्रफूल मोरे यांच्या पथकाने सापळा रचला.

त्यानंतर अत्यंत शिताफीने सदरच्या आर-ोपीला खांदा कॉलनी जवळील आसूडगाव बस स्थानक येथून गुन्हे शाखा कक्ष-२ च्या टीमने ताब्यात घेतले. आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ एक गावठी कट्टा आणि एक देशी बनावटीचे रिव्हॉल्व्हर, ८ एमएम व ३२ एमएम चे असे दोन जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत. सदरच्या गुन्हेगारा विरुद्ध खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद



करण्यात आला आहे. अटक केलेल्या आरोपीचे पूर्ण नाव विनोद कुमार तुफानी राजभर असे असून नवी मुंबईतील सानपाडा येथील सेक्टर ५ याठिकाणी असणाऱ्या शंकर मंदिराजवळील झोपडपट्टी तो राहत होता. आरोपीचा यापूर्वीचा क्राईम रेकॉर्ड तपासला असता यापूर्वी देखील आरोपीविरूद्ध सानपाडा पोलीस ठाणे, ट्रॉम्बे पोलीस ठाणे याठिकाणी विविध प्रकारच्या गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. तसेच आरोपीने यापूर्वी केलेल्या दोन्ही गुन्ह्यांमध्ये १ वर्षाच्या श्रम करावासाची शिक्षा भोगून जानेवारी २०२० मध्ये बाहेर आला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## महावितरणकडून १५१. ५३ कोटी रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल

**वीज वाहिन्यांचे भूमिगत वाहिन्यांमध्ये रूपांतर करणेकामी**

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल शहरी भागातील वीज पुरवठा करणाऱ्या वीज वाहिन्यांचे भूमिगत वाहिन्यांमध्ये रूपांतर करण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरु असलेल्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता. व त्या संदर्भात मागणी व पाठपुरावा करून शासनाचे या प्रश्नावर लक्ष केंद्रित केले. त्या अनुषंगाने महावितरणकडून १५१.५३ कोटी रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) बनविण्यात आला, असून सदर डीपीआर १.३ टक्के डीडीएफ योजनेंतर्गत समाविष्ट करून पनवेल महानगरपालिकेडे कार्यकारी अभियंता, महावितरण पनवेल शहर यांनी दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ रोजी सादर केला आहे, अशी माहिती लेखी उत्तराद्वारे राज्याचे ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केलेल्या तारांकित प्रश्नात, पनवेल शहरी भागातील वीज पुरवठा करणाऱ्या वीज वाहिन्या भूमिगत करण्याची मागणी ऊर्जा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली असल्याचे नमूद करून शहरातील उच्च व लघुदाब वीज वाहिन्या जवळपास २० ते २५ वर्षे इतक्या जुन्या असल्याने जीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे पावसाळ्यात ठिकठिकाणी होणारे शॉर्ट सर्किट तसेच पक्षी बसून वीज वाहिन्या बंद पडून वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये असंतोषाचे ..../२

## जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या हस्ते महा कृषी ऊर्जा पर्वाचे उद्घाटन संपन्न

**अलिबागमध्ये जनजागृतीपर सायकल रॅलीचे आयोजन**

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



अलिबाग विभागामध्ये महा कृषी ऊर्जा अभियानांतर्गत कृषी ऊर्जा पर्व साजरे करताना आज सकाळी जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांच्या हस्ते जनजागृतीपर सायकल रॅलीचे हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्य अभियंता, भांडूप नागरी परिमंडळ भांडूप श्री. सुरेश गणेशकर, अधीक्षक अभियंता, पेण मंडळ श्री. दिपक पाटील, कार्यकारी अभियंता, अलिबाग विभाग कुंदन भिसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यावेळी म्हणाल्या की, जीवाश्म इंधनाचा साठा दिवसागणिक कमी होत असून सौर ऊर्जा म्हणजेच हरित ऊर्जेचा वापर करणे नितांत गरजेचे आहे. सौर ऊर्जेचा प्रभावी वापर करून शेतकऱ्यांना शाश्वत वीज पुरवठा दिल्यास त्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल व खऱ्या अर्थाने राष्ट्र सुजलाम्-सुफलाम् होईल. निसर्ग चक्रीवादळात महावितरणने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीचा उल्लेख करीत जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांनी यावेळी सर्व संबंधितांचे विशेष कौतुकही केले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक करताना मुख्य अभियंता श्री. सुरेश गणेशकर यांनी कृषी पंप वीज जोडणी धोरण २०२०, सौर कृषी वाहिनीद्वारे दिवसा पुरवठा करणे, कृषी ग्राहकांकडून जमा झालेल्या वीज बिल रकमेचा विनियोग कृषी ग्राहकांकरीता पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरण करण्याविषयीच्या तरतूदी या विषयांची उपस्थितांना विस्तृत माहिती दिली. वीज बिल वसुलीच्या माध्यमातून ग्रामपंचायतींचा सहभाग असल्यास ग्रामपंचायतींचे निश्चित सक्षमीकरण होईल,असे सांगून त्यांनी ..../२

## खारघर पाठोपाठ तळोजा वासियांचा वाढीव मालमत्ता कराला विरोध ; फोरमच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या तीन-चार महिन्यांपासून पनवेल महानगरपालिकेकडून पनवेल महानगरपालिका परिसरामधील वेगवेगळ्या शहरांमध्ये टप्याटप्प्याने मालमत्ता कराबाबतच्या नोटीस मालमत्ताधारक तसेच हाउसिंग सोसायटी यांना देण्यात येत आहेत. सदरच्या मालमत्ता कराला, सर्व शहरांमधून, सर्वच उत्पन्न गटांमधील नागरिकाकडून मोठा विरोध होत आहे. खारघर परिसरात सर्वात शेवटी मालमत्ता कराच्या नोटीस दिल्यानंतर खारघर फोरम या सामाजिक संस्थेतर्फे व नगरसेविका लीना अर्जुन गरड यांच्या वतीने मालमत्ता करात प्रखर विरोध दर्शविला. हा विरोध तळोजा शहरापर्यंत पोहचला असून तळोजा मधील रहिवासी मालमत्ता कराविरोधात एकवटताना दिसुन येत आहेत.

खारघर फोरमने प्रामुख्याने सिडकोचा सर्विस चार्ज आणि महानगरपालिकेच्या मालमत्ता कर, असा दुहेरी कर म्हणजेच डबल टॅक्सेशनला पूर्णपणे विरोध दर्शविला आहे.याशिवाय पनवेल महानगरपालिकेने , मालमत्ता कर १ ऑक्टोबर २०१६ पासून मागणी केलेली आहे. सदर मागणीलाही पूर्णपणे विरोध ..../२

## उरण काळाधोंडा येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे विविध मागण्यांसाठी साखळी उपोषण

**साखळी उपोषणाचा ६६ वा दिवस ; तरीही अजून शेतकऱ्यांना न्याय मिळेना**

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण काळाधोंडा येथील स्थानिक भूमीपुत्र असलेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा विविध मागण्या संदर्भात आज दि १० मार्च २०२१ रोजी साखळी उपोषणाचा ६६ वा दिवस आहे. तरी अजूनही या शेतकऱ्यांना न्याय मिळालेले नाही. अजूनही शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य झालेल्या नाहीत त्यामुळे आता थेट महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीच यात लक्ष घालावे अशी मागणी आता उरण तालुक्यातील काळाधोंडा येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

सविस्तर वृत्त असे की उरण तालुक्यातील कोटनाका-काळाधोंडा येथील प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी रेल्वे प्रकल्पा करिता रेल्वे व सिडको प्रशासन मार्फत संयुक्त रित्या संपादित करण्यात आली त्याबदल्यात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कोणतेही नुकसान भरपाई मिळाले नाही.त्यामुळे आक्रमक झालेल्या संतप्त शेतकऱ्यांनी २७/११/२०२० पासून कोटनाका येथे रेल्वे प्रकल्पाचे काम बंद करत साखळी उपोषणाला सुरवात केली आहे.शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्याने ते साखळी उपोषण आजही ..../२

# आदीवासी वाडीमध्ये ‘मोबाईल मेडिकल युनिट सेवा’ सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक महिला दिनानिमीत्त आणि पनवेल महापालिकेच्या नगरसेविका हर्षधा उपाध्याय यांच्या प्रयत्नाने महापालिके मार्फत आदीवासी वाडीमध्ये ‘मोबाईल मेडिकल युनिट सेवा’ सुरु करण्यात आली आहे. या सेवेचा महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्याहस्ते आणि सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी शुभारंभ झाला. तसेच या वेळी आदीवासी वाडीतील महिलांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले.



पनवेल महापलिका हद्दीतील फणसवाडी आणि चाफेवाडी या आदीवाड्यांमध्ये महापलिकेमार्फत ‘मोबाईल मेडीकल युनिट सेवा’ सुरु करण्यात आली आहे. ही सेवा नगरसेविका हर्षधा उपाध्याय यांनी महापौर डॉ कविता चौतमोल आणि सभागृहनेते परेश ठाकूर यांच्याहकडे पाठपुरावा करुन तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आली आहे. गेल्या वीस वर्षांपासून सिडको आणि ग्रामपंचायतीच्या माध्यमातून अश्या प्रकारची कोणतीही सेवा या आदीवासीवासी वाड्यांमध्ये देण्यात आली नसून, हर्षधा उपाध्याय यांनी ही वैद्यकीय सेवा महापालिकेमार्फत सुरु केली आहे. या ‘मोबाईल मेडिकल युनिट सेवेच्या शुभारंभा वेळी पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती अ सभापती अनिता पाटील, नगरसेवक शत्रृघ्न काकडे, नगरसेविका हर्षधा उपाध्याय, भाजपनेते वासुदेव पाटील, अमर उपाध्याय, मोना आडवाणी, गीता चौधरी, शामलाल सुरेश, मुधीमीता जीना, शोभा मिश्रा, बीना गोगरी, किरण रावडे, अजय जाधव, सचिन गणबाज, सुरेश पारधे, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते. तसेच या वेळी भारतीय जनता पार्टी आणि नगरसेविका हर्षधा उपाध्याय यांच्या वतीने आदिवासी वाड्यांमधील महिलांना अन्नधान्याचे वााटप करण्यात आले.

## ३८ वर्षीय इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

फुलहार विक्री करणारा ३८ वर्षीय इसम घरात कोणाला काहीही न सांगता निघून गेले आहेत. त्यामुळे तो हरवली असल्याची तक्रार कामोठे पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. मोठा खांदा गाव येथील दिनू रामबहादुर राजभर घरातून बाहेर गेला आहे. तो अंगाने सडपातळ, रंग सावळा चेहरा उभट आहे. त्याची उंची पाच फूट, आठ इंच असून अंगात फुल शर्ट आणि पॅन्ट, पायात चप्पल घेतलेली आहे. या ईसमाबाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी महिला पो–लीस नाईक एम व्ही. पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

## सुधागड तालुक्यात कोरोनाचा पुन्हा उद्रेक

**दै.रायगड नगरी । पाली/सुधागड**

सुधागड तालुक्यात कोरोना चा पुन्हा संसर्ग वाढू लागला आहे. दोन आठवड्यापूर्वी तालुका कोरोनामुक्त झाला होता.मात्र आता कोरोनाचा उद्रेक होत असल्याने नागरिक धास्तावले आहेत. सध्या तब्बल १३ सक्रिय रुग्ण आहेत. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांच्याकडून मंगळवारी सायंकाळी उशिरा मिळालेल्या माहितीनुसार तालुक्यात ५ नवीन कोरोना बाधित रुग्ण सापडले आहेत. त्यामुळे कोरोना संसर्ग रोखण्याचे प्रशासनापुढे तगडे आव्हान उभे ठाकले आहे.

सध्या तालुक्यात कोरोनाचे १३ सक्रिय रुग्ण असून यातील ११ रुग्ण गृहविलगीकरणमध्ये तर २ रुग्ण रूग्णालयात उपचार घेत आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशीकांत मढवी यांनी दिली. सुधागड तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे ४६६ रुग्ण झाले असून ४२७ रुग्ण बरे झाले आहेत. आणि २६ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील डॉ. मढवी यांनी दिली आहे. नागरिकांनी शासन नियमांचे पालन करून योग्य खबरदारी घ्यावी व अफवांना बळी पडू नका असे आवाहन डॉ. मढवी यांनी केले आहे.

## सुधागड तालुक्यात मनसेचा गड होतोय भक्कम ; असंख्य तरुणांचा मनसेत जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या सक्षम व प्रभावी नेतृत्व तसेच दिशादर्शक विचारांनी प्रेरित होत तरुण मोठ्या संख्येने मनसेत प्रवेश करीत आहेत. सुधागड तालुक्यात मनसेचा गड दिवसेंदिवस भक्कम होतोय. मनसे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या मेहनतीला यश येत असून पक्षसंघटना बळकट होताना दिसतेय. मनसेच्या १५ व्या वर्धापन दिनी रायगड जिल्हा अध्यक्ष श्री जितेंद्र पाटिल यांच्या मार्गदर्शनाखाली सुधागड तालुका अध्यक्ष सुनिल साठे यांच्या उपस्थितीत सुधागड तालुक्यातील आसरे , जांभूळपाडा, विजय नगर येथील तरुणांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत जाहीर प्रवेश केला. सुधागड तालुक्यात मनसेने आजवर अनेक सामाजिक व जनहितार्थ प्रश्न हाती घेऊन तळागळातील सर्वसामान्य घटकाला न्याय देण्याची भूमिका ठेवली आहे. शासनदरबारी जनतेला योग्य व जलद न्याय मिळावा यासाठी मनसे झटते आहे. त्यामुळे मनसे पक्षसंघटनेला आता अधिकाधिक उभारी मिळाली आहे. यावेळी आपल्या मार्गदर्शनात सुनिल साठे म्हणाले की जिल्ह्यातील अथवा राज्यातील कोणताही व कुणाचाही प्रश्न सोडविण्याची धमक मनसे पक्षात आहे. तालुक्यातील तरुणांसमोर तालुक्याच्या विकासाच्या आणि प्रत्येक प्रश्नाच उत्तर मनसे हेच वाटु लागल आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


# शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविल्यास जास्त मोबदला देण्याचे आमिष दाखवून केली २७ लाखाची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविल्यास जास्त मोबदला देण्याचे आमिष दाखवून नाशिक येथे राहणाऱ्या बाळासाहेब बागुल नामक व्यक्तीने कामोठे येथील जतिन चौहाण या नातेवाईकाला शेअर मार्केटमध्ये २७ लाख रुपये गुंतविण्यास भाग पाडून त्यांना गुंतविलेली रक्कम तसेच गुंतविलेल्या रक्कमेवरील लाभांश न देता, त्यांची ५७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात खांदेश्वर पोलिसांनी बाळासाहेब बागुल याच्या विरोधात फसवणुकीसह विश्वासघात केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणातील तक्रारदार जतिन चौहाण (३५) कामोठे, सेक्टर–२१ मध्ये राहण्यास असून ते अमेरिका येथे नोकरीस आहेत. अमेरिकेतून ते भारतात येत–जात असतात. तर चौहाण यांची फसवणूक करणारा त्यांचा साडू बाळासाहेब रतन बागुल नाशिक येथे राहण्यास असून तो शेअर मार्केटचे काम करतो. २०१६ मध्ये बागुल याने त्याच्या मे.सप्तश्रृंगी इनव्हेस्टमेंट अॅन्ड फायनान्शीअल सर्व्हीसेस या कंपनीमार्फत शेअर मार्केटमध्ये सोने, चांदी, तांबे आणि वुड आईलमध्ये पैसे गुंतवून लोकांना जास्त प्रमाणात फायदा करुन देत असल्याचे जतिन चौहाण यांना सांगितले होते. तसेच त्यांनी शेअर मार्केटमध्ये एक लाख रुपये एक वर्षासाठी गुंतविल्यास त्यांना प्रति महिना ७ हजार रुपये परतावा देण्याचे तसेच ते जितकी जास्त रक्कम त्यांच्या कंपनीमध्ये गुंतवतील तितका जास्त परतावा त्याचप्रमाणे गुंतविलेली रक्कम आणि त्यावरील नफा देण्याचे आश्वासन दिले होते. बाळासाहेब बागुल नातेवाईक असल्याने जतिन चौहाण यांनी त्याच्यावर विश्वास ठेवून त्याच्या सांगण्याप्रमाणे एप्रिल २०१८ मध्ये ३ लाख रुपयांची रक्कम एक वर्षासाठी गुंतविली. त्यावेळी बागुल याने जतिन चौहाण यांना गुंतविलेल्या रक्कमेवर जास्त परतावा देऊन त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर बागुल याने शेअर मार्केटमध्ये रक्कम गुंतविल्यास जास्त फायदा होत असल्याचे सांगून चौहाण यांना आणखी काही रक्कम गुंतविण्यास सांगितले. त्यामुळे चौहाण यांनी जुलै २०१८ मध्ये आणखी १० लाख आणि त्यानंतर ५ लाखांची रक्कम गुंतविली. त्यानंतर बागुल याने गुंतवणुकीवर देण्यात येत असलेल्या नफ्यामध्ये आणखी एक टक्का जादा लाभांश देण्याचे आमिष चौहाण यांना दाखवून त्यांना आणखी ७ लाख रुपये गुंतवणूक करण्यास भाग पाडले.

त्यानंतर बागुल याच्या सांगण्यावरुन प्रॉपर्टी मार्ट या शेअर मार्केटींग करणाऱ्या कंपनीमध्ये चौहाण यांच्या पत्नीच्या नावाने डिमॅट अकाऊंट उघडून त्यात २ लाख रुपये गुंतविले. अशा पध्दतीने जतिन चौहाण यांनी बाळासाहेब बागुल याच्यावर विश्वास ठेवून एकूण २७ लाख रुपये गुंतविले. तर सदर गुंतविलेल्या रक्कमेपोटी बागुल याने चौहाण यांना लाभांश म्हणून १० लाख १७ हजार रुपये दिले. त्यानंतर चौहाण यांनी बागुल याच्याकडे डिसेंबर २०१८ या महिन्याच्या लाभांशाची मागणी केली असता, बागुल याने मार्केट डाऊन असल्याने शेअर मार्केटमधुन लाभांश मिळणे बंद झाल्याचे तसेच एकत्र लाभांश देण्याचे आश्वासन दिले. मात्र, त्याने मुळ रक्कम किंवा लाभांश दिला नाही. त्यामुळे चौहाण नाशिक येथे बागुल याच्या घरी गेल्यानंतर त्याने मुद्दल आणि लाभांशाचे असे एकूण २७ लाख रुपयांचे पाच चेक चौहाण यांना दिले. तसेच उर्वरीत ३० लाख रुपयांचे चेक नंतर देण्याचे आश्वासन दिले. बागुल याने दिलेले चेक बाऊन्स झाल्यानंतर चौहाण यांनी बागुल याला संपर्क साधल्यानंतर त्याने रक्कम देण्यास टाळाटाळ करुन पैसे देण्यास नकार दिला. तसेच पोलिसांत तक्रार केल्यास महागात पडेल असे सांगून त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली. अखेर या प्रकारानंतर चौहाण यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

## महिलांदिनानिमित्त शिंपी समाजातील जेष्ठ महिलांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुका नामदेव शिंपी समाजातर्फे महिला दिन मोठ्या उत्साहत आणि आनंदात संपन्न झाला. स्नेहल कळस यांच्या निवासस्थानी संपन्न झालेल्या या महिला दिनाच्या कार्यक्रमांस शिंपी समाज महिला मंडळ अध्यक्षा मीनल महेंद्र ढवळे, स्नेहल उदय कळस, निकिता प्रमोद कळस, भावना संदिप बारटक्के, प्राची प्रसाद जावळे, सरिता संतोष पानसरे आणि समाजातील महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या. या महिलादिनाच्या कार्यक्रमानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दरवर्षी महिलांदिनानिमित्त समाजातील दोन जेष्ठ महिलांचा साडी, चोळी, श्रीफळ –पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यामध्ये धनश्री दिलीप करंबे आणि अमृता अजित कळस यांना समाजातर्फे गौरव करण्यात आला. याप्रसंगी समाज अध्यक्षा नीता महेंद्र ढवळे आणि जेष्ठ समाज भगिनी इंदुमती प्रभाकर करंबे यांनी समाज भगिनींना महिला दिनाचे महत्व पटवून देताना महिलांनी सक्षम होऊन प्रत्येक प्रसंगाला सामोरे जाणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले.समाजाच्या उपाध्यक्षा नेहा प्रविण पाटकुले कार्य बाहुल्यामुळे बाहेर असल्याने सदर कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. शेवटी प्राची जावळे यांनी सर्वांचे आभार मानले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री.मुर्तुजा अली तुरुब बैग हे सदनिका क्र.२ ई/एल.आय.जी.२/डी.२३, कळंबोली, नवी मुंबई ४१०२१८ वरील नमूद केलेल्या सदनिकेचे कायदेशीर मालक असून वर नमूद केलेली मिळकत आमचे अशिल श्रीमती.कांताराणी मंजीतसिंग पुरी यांना विकण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही विक्री, देणाण–घेवाण, गहाण, विश्वस्त संस्था, वारसा भाडेकरार, ताबा, खरेदीखत, बक्षिस, मृत्यूपत्र, वाटप पत्र व इतर कोणतेही स्वरुपाचा करार असल्यास अगर इतर कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या पुष्ठ्यार्थ सर्व कागदपत्रांची पुराव्यासह खालील कार्यालयीन पत्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत सुचित करणे आवश्यक आहे. जर अशा प्रकारची कोणतीही हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाचाही कसलाही हितसंबंध राहणार नाही. अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल. प्रस्तुतच्या मुदतीनंतर सदरच्या मालमत्तेबाबत कोणाचीही व कसलीही हरकत आल्यास ही ग्राह्य धरली जाणार नाही.

**सही/–**
**अॅड.राजेश रामा चौधरी**
**शॉप नं.८, क्रिष्णा टॉवर को.ऑप.हौ.सो.**
**प्लॉट नं.१२/१३, सिडको ऑफिसच्या विरुद्ध, बँक ऑफ इंडिया जवळ, सेक्टर ५ ई, कळंबोली, नवी मुंबई–४१०२१८**
**मो.नं.९८३३९८९१९८/९८२०९८९१९८**

मा.पाठक सो
अर्जदाराचे वकील : अॅड.प्रमोद म. ठाकूर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.२३३/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०७/४/२०२१

१) श्रीमती.अनिता कौस्तुभ गुदग व इतर २ — अर्जदार
विरुद्ध
श्रीमती.सुलोचना लक्ष्मण गुदग — सामनेवाली

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदार, श्रमती.अनिता कौस्तुभ गुदग यांचे पती कै.कौस्तुभ लक्ष्मण गुदग, यांचा दि.०१/११/२००९ रोजी निधन झालेले आहे. त्यांच्या मृत्यूसमयी नावे असलेली रा.बी.१०/२/१/२, बीएसएनएल ऑफिसजवळ, सेक्टर १३, नवीन पनवेल ही मिळकत त्यांची पत्नी अर्जदार श्रीमती.अनिता कौस्तुभ गुदग यांनी कै.कौस्तुभ लक्ष्मण गुदग यांच्या मृत्यूपश्चात खालील मिळकतीसंबंधी वारसादाखला मिळण्यासाठी पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात दिवाणी चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सिडको कॉलनी, नवीन पनवेल येथील निवासी सदनिका नं.बी–१०/२/१/२, सेक्टर १३, मधील २२.२० स्क्वेअर फूट इतक्या मोजमापाच्या क्षेत्रफळाचे निवासी सदनिका.**

तरी, सदरची अर्जदार ही कै.कौस्तुभ लक्ष्मण गुदग, यांची कायदेशीर वारस आहे. या त्यांच्या कायदेशीर हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती द्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या मुदतीच्या आत मा.न्यायालयात आपली हरकत दाखल करावी. वरील अर्जास विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मा.न्यायालय अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे सदर कामी वारसाचा दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.०९/०३/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

## १५१. ५३ कोटी रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल

वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल शहरातील वीज पुरवठा सुरळीत राहण्यासाठी विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे, अशीही विचारणा या प्रश्नाच्या माध्यमातून शासनाला केली. तसेच या संदर्भात त्यांनी मागणी करून सातत्याने पाठपुरावा केला आहे.

या प्रश्नावर ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, पनवेल शहरास वीज पुरवठा करणाऱ्या काही उच्चदाब व लघुदाब वाहिन्या उपरीतार पद्धतीच्या असून त्या साधारणतः ३० वर्षांपेक्षा जास्त जुन्या झाल्या कारणाने वादळवाऱ्यात झाडाच्या फांद्या पडून वीज पुरवठा खंडित होण्याच्या घटना पावसाळ्यात घडून येतात. अखंडीत वीज पुरवठा करण्याच्या उद्देशाने उपरीतार लघुदाब व उच्चदाब वाहिन्यांचे भूमिगत वाहिन्यांमध्ये रूपांतर करण्याकरिता महावितरणकडून १५१. ५३ कोटी रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) बनविण्यात आला असून सदर डीपीआर १.३ टक्के डीडीएफ योजनेंतर्गत समाविष्ट करून पनवेल महानगरपालिकडे कार्यकारी अभियंता, महावितरण पनवेल शहर यांनी दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ रोजी सादर केला आहे.

## महा कृषी ऊर्जा पर्वाचे उद्‌घाटन संपन्न

माझे वीज बिल–माझी जबाबदारी या संकल्पनेचे महत्त्व उपस्थितांना विषद केले.

जिल्हाधिकारी निधी चौधरी व मुख्य अभियंता सुरेश गणेशकर यांनी सायकल रॅलीला हिरवा झेंडा दाखविल्यानंतर सायकल रॅलीला सुरुवात झाली. या रॅलीमध्ये अलिबाग उपविभागाचे श्री.सादेकपाशा इनामदार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. मोतीराम राख, उपकार्यकारी अभियंता तसेच पेण उपविभागाचे अभियंते तसेच विभागीय/उपविभागीय कार्यालयातील सर्व कर्मचारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी कार्यालयातून सुरू झालेल्या या सायकल रॅलीची खंडाळा गावात सांगता झाली. या ठिकाणी श्री. काशिनाथ तुणतुणे, श्री. विकास पाटील, श्री. पांडुरंग पाटील, श्री. विष्णू म्हात्रे हया शेतकऱ्यांनी त्यांच्या कृषी पंपाच्या वीज बिलाचा भरणा केला. त्यानंतर वीज बिल भरणाबाबत जनजागृती होण्यासाठी व नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी अधीक्षक अभियंता पेण श्री.दिपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माझे वीज बिल – माझी जबाबदारी व बळीराजा जागा हो, वीज बिलातून मुक्त हो इत्यादी घोषणा दिल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कनिष्ठ अभियंता श्री. चेतन भोईर, सहाय्यक अभियंता श्री. विशाल सुर्यवंशी, जिल्हा बेरोजगार तांत्रिक संघटनेचे श्री. निलेश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

## फोरमच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती

दर्शविलेला आहे. याशिवाय मालमत्ता कराचे जे दर पनवेल महानगर पालिकेने ठरविलेले आहेत , ते दर खूपच जास्त असल्याची भूमिका फोरमने घेतली आहे.याकरिता नागरिकांच्या जनजागृतीसाठी डबल टॅक्सेशनला विरोध करणारे जनजागृतीपर रथ तयार करण्यात आले आहे. विशेष म्हणजे सिडकोने तयार केलेल्या शहरातील नवी मुंबई महानगरपालिका पेक्षा सुद्धा ते दर खूप जास्त आहेत. त्यामुळे या मालमत्ता कराच्या जरासे खारघर फोरमने पूर्णपणे विरोध दर्शविलेला असल्याचे नगरसेविका गरड यांचे म्हणणे आहे. तळोजा येथील तळोजा कॉलनी फोरमने तळोजा फेज वन याठिकाणी तळोजा फेज वन आणि फेज टू मधील सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांची कोविड १९ बाबतचे सामाजिक अंतराचे नियम पाळून, बैठक आयोजित केली होती. सदरची बैठक यशस्वी करण्यासाठी तळजा कॉलनी फोरमचे प्रसाद ढगे पाटील , महेश साळुंखे, चित्रपट अभिनेता सुदीप पांडे, नारायण गायकवाड, अफरोज शेख, दीपक झांजुरणे, अहते श्याम झकारिया, समीर इनामदार आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांचे विविध मागण्यांसाठी साखळी उपोषण

सुरुच आहे. जो पर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत हे साखळी उपोषण असेच सुरु राहणार असल्याचे मत नवनीत भोईर, निलेश पाटील यांनी व्यक्त केले. मात्र मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा स्थानिक रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती सेवा संस्था काळाधोंडा व कोट ग्रामसुधारणा मंडळाचे पदाधीकारी कार्यकर्त्यांनी दिला आहे.यावेळी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी(उपोषण स्थळी )नवनीत भोईर, हेमदास गोवारी, निलेश पाटील, सुनील भोईर, सुरज पाटील, भालचंद्र भोईर, महेश भोईर, कृष्णा जोशी, निलेश पाटील, पुरषोत्तम पाटील, सुरेश पाटील, चेतन पाटील, प्रसाद गोवारी, अजित भोईर, राजेश भोईर आदी स्थानिक रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती सेवा संस्था काळाधोंडा व कोट ग्रामसुधारणा मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. उरण तालुक्यातील कोटनाका काळाधोंडा येथील शेतकऱ्यांच्या जमिनी सिडको व रेल्वे प्रशासनाने संयुक्तपणे रेल्वे प्रकल्पासाठी संपादित केले मात्र त्याबदल्यात आजपर्यंत येथील शेतकऱ्यांना कोणतेही मावेजा, मोबदला अथवा नुकसान भरपाई मिळालेली नाही. सिडको व रेल्वे प्रशासन चर्चेला सुद्धा तयार नव्हते. सुरवातीपासूनच रेल्वे व सिडको प्रशासनाने येथील शेतकऱ्यांच्या महत्वाच्या समस्यांकडे जाणून बुजून दुर्लक्ष केल्याने रेल्वे व सिडको प्रशासना विरोधात स्थानिक रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती सेवा संस्था काळाधोंडा तसेच कोट ग्रामसुधारणा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तीव्र आंदोलन व काम बंद करण्याचा इशारा देण्यात आला होता या इशाऱ्या कडेही रेल्वे व सिडको प्रशासनाने दुर्लक्ष केले.त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी कोटनाका येथे जाऊन प्रत्यक्ष काम बंद केले आहे.ह्या समस्ये संदर्भात सर्व शेतकऱ्यांनी उरणचे विद्यमान आमदार तथा भाजप नेते महेश बालदी,खासदार श्रीरंग बारणे, माजी आमदार तथा शिवसेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष मनोहर भोईर, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, मनसेचे नेते संदेश ठाकूर, शेतकरी कामगार पक्षाचे नेते विवेक पाटील तसेच विविध राजकीय पक्षातील पदाधिकाऱ्यांची भेट घेतली होती. त्यांच्यासोबत या विषयावर सविस्तर चर्चा केली. व या समस्या सोडविण्याची मागणी संबंधित शेतकऱ्यांनी राजकीय पदाधिकाऱ्यांकडे केली होती.त्यावेळी स्थानिक रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती सेवा संस्था काळाधोंडा व कोट ग्रामसुधारणा मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहून सर्व राजकीय पदाधिकाऱ्यांची भेट घेतली होती.सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी यांनी सकारात्मक भूमिका घेत काळाधोंडा येथील शेतकऱ्यांना योग्य ते न्याय देण्याची भूमिका घेतली होती. विद्यमान आमदार महेश बालदी यांनी याबाबत आपण वरिष्ठांपर्यंत पाठपुरावा करणार असल्याचे व शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते तर खासदार श्रीरंग बारणे यांनी संघटनेची सिडकोची व रेल्वे प्रशासनाची संयुक्त बैठक लावून दिली. प्रशांत पाटील तसेच मनोहर भोईर यांनीहि सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले होते मात्र अनेक दिवस उलटूनही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना योग्य तो न्याय मिळाले नसल्याने कोटनाका काळाधोंडा येथील शेतकऱ्यांनी काम बंद आंदोलन करत साखळी उपोषण सुरु केले आहे या उपोषणाचा आज ६६ वा दिवस आहे .आता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यात लक्ष घालावे अशी मागणी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.सिडको व रेल्वे प्रशासन, प्रांत कार्यालय पनवेल यांचे संयुक्त बैठक सुद्धा झाले, चर्चा झाली पण शेतकऱ्यांना योग्य तो न्याय मिळू शकला नाही.माहिती अधिकारात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिले गेले नसल्याचे सिद्ध झाले आहे. तरी शासन नुकसान भरपाई बाबत योग्य भूमिका घेत नाही.मंत्रालयात रेल्वे, सिडको व शेतकरी यांच्यात झालेल्या बैठकी दरम्यान मंत्री आदितीताई तटकरे, पालकमंत्री खासदार सुनील तटकरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले होते मात्र शासकीय अधिकाऱ्यांनी या आदेशा कडे दुर्लक्ष केल्याचे समजते. त्यामुळे या समस्ये संदर्भात उच्च न्यायालयात जनहित याचिका सुद्धा शेतकऱ्यांच्या वतीने दाखल करण्यात आली आहे. सर्व प्रकल्पग्रस्त शेतकरी आता न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यात लक्ष घातल्यास ही समस्या सुटेल अशी आशा येथील शेतकऱ्यांना आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# वर्षपूर्तीनिमित्त पुनरावृत्ती नको..काळजी घ्या.!




पनवेल महापालिका हद्दीत पहिला करोना रुग्ण बरोबर १ वर्षापूर्वी म्हणजेच दि.१० मार्च २०२० रोजी सापडला होता. आज वर्षपूर्तीनंतर करोना आपल्या शहरातून कायमस्वरूपी जाईल, अशी आशा निर्माण झाली होती. तथापि तसे न होता आज पुन्हा एकदा करोना रुग्णाची संख्या पुन्हा एकदा वाढताना दिसत आहे. आज १०० पेक्षा जास्त करोना रुग्ण महापालिकेच्या हद्दीमध्ये आढळलेले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा गेल्या वर्षीप्रमाणेच करोना संसर्ग रोखण्यासाठी आपणा सर्वांना प्रयत्न करावे लागणार आहेत.

गेल्या वर्षभरामध्ये आपण सर्वच पनवेलकर त्यामध्ये सर्व अधिकारी कर्मचारी, पोलिस अधिकारी, लोकप्रतिनिधी, पत्रकार, एनजीओ, डॉक्टर्स, नर्स, वॉर्डबॉय, सफाई कामगार इत्यादींनी आपला स्वतःचा जीव धोक्यात घालून पनवेल मधील करोना रुग्णांना वाचविण्यासाठी जिवापाड प्रयत्न केले, त्यामुळेच आपल्या शहरात इतर शहरांच्या मानाने करोनाची लागण कमी झाली होती. तरीसुद्धा गेल्या वर्षभरामध्ये दुदैवाने ६४८ लोकांना करोनामुळे आपला जीव गमवावा लागला तर ३० हजार नागरिकांना करोनाची लागण झाली.

मात्र सद्य:स्थितीमध्ये करोनाची भीती गेल्यासारखे लोक वागत असून कुठल्याही प्रकारचे कोविड-१९ चे प्रोटोकॉल, शासकीय सूचना न पाळता, नियम न पाळता रस्त्यावर, बाजारामध्ये फिरत आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा करोनाने आपले डोके वर काढले असून संसर्ग वाढत आहे. ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. त्यामुळे करोनावर मात करायची असेल तर मास्क वापरणे, सोशल डिस्टंसिंग पाळणे, सॅनिटायझरचा वापर करणे, वारंवार हात स्वच्छ धुणे अतिशय गरजेचे आहे, तसेच अतिशय गरज असेल तरच घराबाहेर पडणे, या गोष्टी पाळणे, ही काळाची गरज बनली आहे. नाहीतर काळच आपल्याला आपल्या लोकांपासून हिरावून नेईल. म्हणून पश्चाताप करीत न बसता पुन्हा एकदा सर्वांना विनंती आहे की, आपण करोनाचे नियम पाळा आणि करोनावर मात करा. शासनाच्या माझे कुटूंब-माझी जबाबदारी तसेच मी जबाबदार मोहिमेमध्ये जबाबदारीने सहभागी होवून शासन व जिल्हा प्रशासन करीत असलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करा.

**श्री.संजय गोविंद शिंदे**
**उपायुक्त, पनवेल महानगरपालिका**

# वेळास येथील डोंगराला वणवा वनविभागाच्या उदासीन धोरणामुळे तात्काळ उपाययोजना नाहीच

**दै.रायगड नगरी । शिस्ते**



श्रीवर्धन तालुक्यातील वेळास गावांच्या हद्दीतील वनविभागाच्या डोंगराला लागलेल्या वणव्यात पशु पक्षी, सरपटणारे प्राण्यांसह जनावरांचा चारा नष्ट झाला असून गेल्यावर्षी लागलेल्या वणव्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची घटना घडली असताना वन विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याची बाब समोर आली आहे. वन विभाच्या ढिसाळ कारभारामुळे जाळपट्टे काढले जात नाहीत, यामुळे डोंगराच्या डोंगर आणि वनविभागाच्या हद्दीतील झाडे या वणव्यांच्या भक्षस्थानी पडत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. रात्री डोंगरांना लागलेले वणवे स्थानिक नागरिक यांनी विझवले.

वेळास परिसरातील डोंगरावर व वनविभागाच्या हद्दीत वणवा लागला. या वणव्यात जवळपास दोन ते पाच हेक्टर परिसर जाळून खाक झाला. यात लहान झाडे पशु पक्षी शेतकऱ्यांनी जनावरांसाठी साठवलेला चारा यांचे मोठे नुकसान झाले. येथील दाट जंगलात अदिवास करणारे ससे, मोर लांडोर, यांच्यासह सरपटणारे प्राण्यांसह जंगलातील झाडांचे मोठे नुकसान झाले. गावाच्या डोंगरांना वाणवा लागल्याने तो विझवण्यासाठी ग्रामस्थांनी मोठे प्रयत्न केले. पाणी आणि झाडाच्या पाने असलेल्या फांद्यांच्या सहाय्यने वानवा विझवला. या परिसरात दरवर्षी लागणारे वणवे रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करावी. वनविभागाने याकडे लक्ष द्यावे आणि जंगलसंपत्ती वाचविण्याचे प्रयत्न करावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी व सामाजिक संस्थांनी केली आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील अनेक गावांच्या हद्दीत असलेल्या वनविभागाच्या जंगलाला दरवर्षी वणवा लागत असतात, मात्र वनविभागाकडून प्रभावी उपाय योजनाच केली जात नाही. शासन एकीकडे झाडे लावण्यासाठी प्रचंड अनुदान देते यासाठी जनजागृती करीत वृक्ष लावगड करते आणि दुसरीकडे त्याची जोपासना करणारे वनविभागात काम करणारे कर्मचारी याकडे मोठे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे जंगलसंपत्तीचे मोठे नुकसान होत आहे. शासन दरवर्षी वणवे लागू नये यासाठी मोठ्या प्रमाणात सूचना देते. जाळपट्टे काढण्यासाठी निधी देते, मात्र जाळपट्टे वेळेत आणि आवश्यक त्या ठिकाणी काढले जात नसल्याने वणवे लागण्याची प्रमाण वाढत आहे.

वेळास गावालगतच्या डोंगराला लागलेला वणव्यात अनेक वन्यजीवांची जाळून मृत्यमुखी पडले. दरवर्षी वणवे लागतात मात्र वनविभाकडे तात्काळ वणवे विझवण्यासाठीची यंत्रणाच उपलब्ध नसते हि शोकांतिका आहे असे वेळास येथील हेल्प ग्रुप चे धवल तवसाळकर त्यांनी सांगितले.

# घराला लागलेल्या आगीत मोठे नुकसान ; सुदैवाने जिवीतहानी नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विद्युत दिव्यातून स्पार्क होवून लागलेल्या आगीत घराचे मोठे नुकसान झाले आहे.

तालुक्यातील कुत्तरपाडा येथील शांताबाई पाटील यांच्या घरातील दिवा लावण्यासाठी गेल्या असताना दिव्यामध्ये स्पार्क होवून त्याची ठिणगी बाजूला असलेल्या कपड्यावर पडल्याने कपड्याने पेट घेतला व काही क्षणातच संपूर्ण घर आगीत खाक झाले.

घर लाकडी बांधकामाचे असल्याने आग मोठ्या प्रमाणात लागली होती. आगीची माहिती मिळताच तळोजा अग्नीशमन दलाचे बंब घटनास्थळी पोहोचले व त्यांनी आग आटोक्यात आणली. या आगीत सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नाही.

मे.मुजावर साहेब
अॅड.एस.जी.पाटकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
स्पे.मु.नं.४९१/२०१२
नि.नं.१५/ड
ने.ता.२२/४/२०२१

स्टेट बँक ऑफ इंडिया खांदा कॉलनी शाखा — वादी
विरुद्ध
श्री.कुंलवंतसिंग संगोत्रा वगैरे — प्रतिवादी
१) श्री.कुंलवंतसिंग संगोत्रा
एलआयजी, दुसरा मजला, ए/६८,
सेक्टर १, कळंबोली, ता.पनवेल ४१०२१८
२) सतनामसिंग हरीसिंग केरॉन
बिमा कंपाऊंड, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड

ज्याअर्थी या नोटीसद्वारे जाहिररित्या असे कळविण्यात येते की, स्टेट बँक ऑफ इंडिया, खांदा कॉलनी शाखा, यांनी श्री.कंलवंतसिंग संगोत्रा वगैरे यांच्या विरोधात कर्जाच्या रक्कमेच्या वसूली करता सदरचा दावा दाखल केलेला आहे. त्याअर्थी त्या दावा संबंधीच्या महत्वाच्या प्रश्नांचे उत्तरे देवू शकतील अशा वकीलामार्फत अथवा स्वतः या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर या जाहीर नोटीसद्वारे बजाविण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा आदेश देण्यात येत आहे की, दि.२२/०४/२०२१ रोजी तुमच्या बचावाचे निवेदन दाखल करावे व आवश्यक ते दस्तऐवज दाखल करावे.

तुम्हास नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादीचा दावा एकतर्फी निकाली केला जाईल त्याचा निर्णय केला जाईल.

आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस तुम्ही कोर्टात हजर न झाल्यास सदरचा दावा तुमच्या विरोधात एकतर्फी चालवून निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१० माहे ०३/२०२१ रोजी माझ्या सहीने प्रसिद्ध केली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

अॅड.प्रणाली सोहनी
अॅड.राकेश कडव

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.६०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/४/२०२१

श्री.प्रकाश तुकाराम डाऊर
वय : ५७ वर्षे, धंदा : शेती
रा.दापोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.आंबुबाई तुकाराम डाऊर पूर्वाश्रमीची आंबूबाई गंधूराम घरत ह्या दि.१८/३/१९७८ रोजी मौजे : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाल्या असून, कै.आंबुबाई तुकाराम डाऊर पूर्वाश्रमीची आंबूबाई गंधूराम घरत ह्यांचे पती कै.तुकाराम राघो डाऊर हेही दि.१३/०४/१९७३ रोजी मौजे : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले आहेत. त्यांना अर्जदार एकमेव कायदेशीर वारस आहेत. कै.आंबुबाई तुकाराम डाऊर पूर्वाश्रमीची आंबुबाई गंधुराम घरत यांचे नावे असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**अ) भूसंपादीत न झालेल्या शेतजमीन मिळकती**

| गांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| जासई ता.उरण | ३५ | १३ | ०-०४-००<br>०-०३-३० | ०.४१ |
| | ३७ | ५ | ०-११-६०<br>०-००-८० | १.७५ |
| | १९८ | ६ बी | ०-०१-००<br>०-०१-०० | ०.०२ |

**ब) भूसंपादीत जमीन मिळकती**

| गांव | युनिट केस नं. ॲवॉर्ड नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| जासई ता.उरण | १४७/१४८ | १७२ | ३ | ०-२१-० |
| | | १७२ | ४ | ०-४३-० |
| | | १७२ | ६ | ०-३०-० |
| | | | | ०-९४-० |

येणेप्रमाणे मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै.आंबुबाई तुकाराम डाऊर पूर्वाश्रमीची आंबूबाई गंधूराम घरत यांस १२.५ टक्के गावठण विस्तार योजनेंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर जमीन मिळकती व भूखंड मिळकती कै.आंबुबाई तुकाराम डाऊर पूर्वाश्रमीची आंबुबाई गंधूराम घरत यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारस दाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.१०/०३/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण

श्री.भाकरे सो.कोर्ट
प्रो.जमा.२-२५
अर्जदाराचे वकील
अॅड.श्री.प्रदीप श. म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज (सि.डी./ज्यु.डी.) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.३२२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/५/२०२१

१) श्री.हरीभाऊ हिरा उर्फ हिराजी घरत
वय : ६३ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
२) श्री.जगन्नाथ हिरा उर्फ हिराजी घरत
वय : ६१ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
३) श्री.पुरुषोत्तम हिरा उर्फ हिराजी घरत
वय : ५७ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
४) श्री.हसुराम हिरा उर्फ हिराजी घरत
वय : ५१ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
५) श्री.राजाराम हिरा उर्फ हिराजी घरत
वय : ४३ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
सर्व रा.भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी कै.हिरा उर्फ हिराजी उर्फ हरिश्चंद्र उर्फ हिरामण जेठा घरत हे दि.०६/११/२०२० रोजी मौजे : भेंडखळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे व इतर सहहिस्सेदारांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

अ) मौजे : भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकत होत्या. सदर मिळकती सिडको मार्फत नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादीत करण्यात आलेल्या आहेत. तीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|
| १ | ३५८ | ० | ०-४०-० | ६५/८३-८४ |
| २ | १२ | ४ | ०-१३-५ | २२१/८३-८४ |
| ३ | ३६ | ४ | ०-१३-० | |
| ४ | ३७ | ४ | ०-११-० | |
| ५ | ५७ | ५ | ०-१७-६ | |
| ६ | ३२६ | ६ | ०-११-० | |
| ७ | ४७ | ३ | ०-१५-८ | ६०/८१ |
| ८ | १०० | ७ | ०-०७-९ | |
| ९ | ११६ | ११ | ०-१४-७ | |
| १० | ११५ | २/अ | ०-१५-२ | |
| ११ | १०१ | १२ | ०-०२-५ | ५९/६१ |
| १२ | १५१ | ९ | ०-०१-८ | ५०/७९-८० |
| १३ | १९८ | १ | ०-४३-० | |
| १४ | १९८ | ३ | ०-०९-० | |
| १५ | १९८ | ५ | ०-५०-३ | |
| १६ | १९९ | १/अ | ०-६९-३ | |
| १७ | २०० | १६ | ०-५०-० | |
| १८ | २०० | ३ | ०-०५-० | |
| १९ | १८४ | ३ | ०-००-२ | ४६/८५ |
| २० | १८१ | ३ | ०-०८-९ | १३/८५ |
| २१ | ३९२ | ० | ०-१३-१ | ३२/८३ |
| २२ | २५४ | ११/अ | ०-१९-८ | १५५/८२ |
| २३ | २५४ | ११/ब | ०-०५-८ | |
| २४ | २५५ | १२/अ | ०-३४-५ | |
| २५ | ९६ | ९ | ०-०१-५ | |
| २६ | ७४ | २ | ०-१४-९ | |
| २७ | २४७ | ६ | ०-०३-३ | |
| २८ | २७९ | १० | ०-०५-६ | |
| २९ | २७३ | २ | ०-१६-० | |
| ३० | २७४ | ५ | ०-०४-३ | |
| ३१ | २६४ | १२ | ०-१८-६ | |
| ३२ | २६२ | ४ | ०-०९-० | |
| ३३ | ३०५ | ७ | ०-०९-० | |
| ३४ | २९५ | ३ | ०-०७-० | |
| ३५ | २९५ | २ | ०-१७-० | |
| ३६ | २९५ | १ | ०-०९-५ | |
| ३७ | २८२ | ८ | ०-०३-५ | |
| ३८ | ९० | ५ | ०-०५-७ | |
| ३९ | ६९ | १/ब | ०-१२-६ | |
| ४० | २७४ | १४ | ०-१७-८ | |
| ४१ | ६९ | १/अ | ०-२३-६ | ४२/८२-८३ |
| ४२ | ७३ | ५+६ | ०-१६-० | |
| ४३ | २४५ | ७ | ०-१०-९ | १५६/८२-८३ |
| ४४ | २५३ | ४ | ०-०८-० | |
| ४५ | ११८ | ७ | ०-२७-५ | ६० ब/८२ |
| ४६ | ३१ | २/अ | ०-१४-२ | ६६/८३-८४ |
| ४७ | ५५ | २ | ०-१३-१ | |
| ४८ | १४२ | ३ | ०-०४-५ | |
| ४९ | २०१ | ३ | ०-०८-३ | |
| ५० | ३२७ | ५ | ०-०५-० | |
| ५१ | २९७ | ८ | ०-००-५ | ६४ |
| ५२ | २९३ | ७ | ०-०४-९ | १२३/८२-८३ |
| ५३ | २४६ | १४ | ०-०३-८ | २३३/८३ |
| ५४ | ३०५ | ११ | ०-०४-८ | |
| ५५ | २४९ | १ | ०-०७-७ | ७४/८२ |

सदर मिळकती ह्या महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादीत केलेली आहे. सदर जमिनी मृत्यूपत्र लिहून ठेवणार कै. हिरा उर्फ हिराजी उर्फ हरिश्चंद्र उर्फ हिरामण जेठा घरत व इतर सहहिस्सेदार यांचेवर वर्णन केलेल्या निवाड्यानुसार/युनिट केसप्रमाणे भूसंपादीत केलेल्या केलेल्या आहेत. कै.हिरा उर्फ हिराजी जेठा घरत व इतर सहहिस्सेदार यांना सिडकोकडून १२.५ टक्के योजनेप्रमाणे सुमारे ७८०० चौ.मीटरचे भूखंड वाटप करण्यात आलेले आहेत. सदर भूखंडापैकी सुमारे ३६०० चौ.मीटर इतके भूखंड मृत्यूपत्र लिहून ठेवणार कै.हिरा उर्फ हिराजी जेठा घरत यांचे वारसाहक्काने आलेले आहेत. तसा हक्कसोडपत्र मा.दुय्यम निबंधक सो.उरण यांच्याकडे दिनांक ०९/०७/२००९ रोजी हक्कसोडपत्र दस्त क्र.उरण ६९५/२००९ नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. त्यानुसार कै.हिरा उर्फ हिराजी जेठा घरत हे सदर मिळकतीचे मालक झाले असून सदर मिळकत त्यांनी मृत्यूपत्राने अर्जदार यांना दिलेली आहे.

ब) मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाचे जमीन मिळकती कै.हिरा उर्फ हिराजी उर्फ हरिश्चंद्र उर्फ हिरामण जेठा घरत यांचे नावे असून फेरफार नोंद क्र.७६९ प्रमाणे त्यांचे नावाची नोंद सदर मिळकतीच्या सदरी दाखल करण्यात आलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३८८ | १ | ३-३७-० | ११.३१ |
| ३०५ | १ | १-३८-१२ | ५.५६ |
| ३९९ | १ | ५-०३-८ | ११.३७ |

सदर जमीन मिळकती सिडकोने नवी मुंबई प्रकल्पाकरिता अवॉर्ड क्र.नवघर ३११/८५-८६ प्रमाणे भूसंपादीत केलेल्या असून सदर भूसंपादनाच्या मोबदल्यात सिडकोच्या १२.५ टक्के विकसित भूखंड योजनेंतर्गत मिळणारे भूखंड व इतर फायदे यामध्ये कै.हिरा उर्फ हिराजी उर्फ हरिश्चंद्र उर्फ हिरामण जेठा घरत यांचे नावे प्राप्त होणार आहेत व त्यांचा कायदेशीर अधिकार आहे.

क) मौजे : खोपटे, ता.उरण, जि.रायगड येथील गणेशप्रसाद मिठागर व खोपटे ओवळी भेंडी मिठागर या जमीन मिळकती सिडकोने नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादीत केलेल्या असून सदर भूसंपादनाच्या मोबदल्यात सिडकोच्या १२.५ टक्के विकसित भूखंड योजनेंतर्गत मिळणारे भूखंड व इतर फायदे यामध्ये कै.हिरा उर्फ हिराजी उर्फ हरिश्चंद्र उर्फ हिरामण जेठा घरत यांचे नावे प्राप्त होणार आहेत. सदर भूखंड व त्या मोबदल्यात मिळणारे नुकसान भरपाई व फायदे मृत्यूपत्रामध्ये अर्जदार यांचे लाभांत दिलेले आहेत.

ड) मौजे : भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत मृत्यूपत्र लिहून ठेवणार कै.हिरा उर्फ हिराजी उर्फ हरिश्चंद्र उर्फ हिरामण जेठा घरत व इतर सहहिस्सेदार यांचे मालकी हक्कांतील व ताबेकब्जातील मिळकत आहे. तीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३५४ | ० | ११-८९-० | - |

कै.हिरा उर्फ हिराजी उर्फ हरिश्चंद्र उर्फ हिरामण जेठा घरत यांचे मृत्यूपश्चात वरील मिळकती अर्जदार यांना मृत्यूपत्राप्रमाणे देण्याचे लिहिलेले आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा मृत्यूपत्राचे अंमल बजावणीसाठी प्रोबेट मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा मृत्यूपत्राचे अंमल बजावणीसाठी प्रोबेट देण्यासाठी अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस मृत्यूपत्राचे अंमल बजावणीसाठी प्रोबेट देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ९/३/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

अॅड.प्रणाली सोहनी
अॅड.राकेश कडव

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.६१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/४/२०२१

१) श्री.मधुसूदन जनार्दन म्हात्रे
वय : ७८ वर्षे, धंदा : सुखवस्तू
रा.द्वारकेश को.ऑप.हौ.सोसायटी,
८४९, वाणी आळी, उरण, जि.रायगड
२) श्री.नासिकेत जनार्दन म्हात्रे
वय : ७५ वर्षे, धंदा : सुखवस्तू
रा.सी.१४, कमल पार्क, म्हालवली, उरण, जि.रायगड
३) श्री.मोरेश्वर जनार्दन म्हात्रे
वय : ७१ वर्षे, धंदा : व्यापार
रा.१२७, कोप्रोली, ता.उरण
४) श्रीमती.प्रभावती गणपत घरत
वय : ७२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.८२०, केळवणे, ता.पनवेल
५) श्रीमती.जयश्री कृष्णा ठाकूर
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
घर नं.७५६, पाणदिवे, पो.कोप्रोली,
ता.उरण, जि.रायगड
६) श्रीमती.प्रभावती वामन घरत
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.देऊळपाडा खोपटे, ता.उरण
७) श्री.ध्रुव जनार्दन म्हात्रे
वय : ६१ वर्षे, धंदा : सुखवस्तू
रा.७४३, कोप्रोली, ता.उरण
८) श्रीमती.निशा अरुण म्हात्रे
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.गोवठणे, ता.उरण, जि.रायगड
९) श्रीमती.शकुंतला रमण म्हात्रे
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.२०५, कोप्रोली, ता.उरण — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ते ९ यांची आई कै.जनाबाई उर्फ यशोदा जनार्दन म्हात्रे ह्या ता.२/१०/१९९१ रोजी मौजे : कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड येथे निधन झाल्या असून कै.जनाबाई उर्फ यशोदा जनार्दन म्हात्रे ह्यांचे पती कै.जनार्दन कृष्णा म्हात्रे हे ही ता.१०/७/१९८१ रोजी मौजे : कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड येथे निधन झाले आहेत. त्यांना अर्जदार नं.१ ते ९ असे कायदेशीर वारस आहेत. कै.जनाबाई उर्फ यशोदा जनार्दन म्हात्रे यांचे नावे असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**अ) भूसंपादीत न झालेल्या शेतजमीन मिळकती**

| गांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| जासई ता.उरण | ३५ | १३ | ०-०४-००<br>०-०३-३० | ०.४१ |
| | ३७ | ५ | ०-११-६०<br>०-००-८० | १.७५ |
| | १९८ | ६ बी | ०-०१-००<br>०-०१-०० | ०.०२ |

**ब) भूसंपादीत जमीन मिळकती**

| गांव | युनिट केस नं. ॲवॉर्ड नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| जासई ता.उरण | १४७/१४८ | १७२ | ३ | ०-२१-० |
| | | १७२ | ४ | ०-४३-० |
| | | १७२ | ६ | ०-३०-० |
| | | | | ०-९४-० |

येणेप्रमाणे मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै.जनाबाई उर्फ यशोदा जनार्दन म्हात्रे यांस १२.५ टक्के गावठण विस्तार योजनेंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर जमीन मिळकती व भूखंड मिळकती कै.जनाबाई उर्फ यशोदा जनार्दन म्हात्रे यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारस दाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.१०/०३/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण

# नोकरीच्या अमिषाने खारघरमधील व्यक्तीला दोन सायबर टोळ्यांनी घातला १० लाख ५८ हजार रुपयांना गंडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लॉकडाऊनमुळे नोकरीवरुन कमी केल्यामुळे लिंक्डइन व नोकरी डॉट कॉमवर या वेबसाईटवर दुसऱ्या नोकरीच्या शोधात असलेल्या एका व्यक्तीला दोन वेगवेगळ्या सायबर टोळ्यांनी नोकरी देण्याचे आश्वासन देऊन त्यांच्याकडून तब्बल १० लाख ५८ हजार रुपयांची रोख रक्कम उकळल्याची घटना उघडकिस आली आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर गुन्हेगारांच्या दोन टोळ्यांवर आयटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे. या घटनेतील तक्रारदार खारघर सेक्टर-१९ मध्ये राहण्यास असून ते विक्रोळी येथील एका केमिकल कंपनीत उच्चपदस्थ अधिकारी म्हणून कामाला होते. मात्र करोनामुळे सदर कंपनीने त्यांना नोकरीवरुन कमी करण्याची नोटीस दिल्याने त्यांनी दुसऱ्या नोकरीचा शोध घेण्यास सुरुवात केली होती. त्यासाठी त्यांनी गत फेब्रुवारी महिन्यामध्ये लिंक्डइन व नोकरी डॉट कॉम या दोन वेबसाईटवर आपली माहिती अपलोड केली होती. त्यानंतर १० फेब्रुवारी रोजी सायबर गुन्हेगारांनी त्यांना संपर्क साधुन त्यांना रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. तसेच त्यांना वेबसाईटची लिंक पाठवून त्यात रजिस्ट्रेशन करुन प्रोसेस फी ६७३८ रुपये भरण्यास सांगितले.

त्यानुसार तक्रारदारानी रजिस्ट्रेशन करुन प्रोसेस फी भरल्यानंतर दुसऱ्या दिवशी सायबर गुन्हेगाराने त्याच्या इतर साथिदारांच्या मदतीने स्काईप व्हिडीओ कॉलवर त्यांची मुलाखत घेण्याचा बहाणा केला. त्यानंतर त्यांची नेमणुक झाल्याचे सांगून त्यांना सर्व्हीस चार्जेस म्हणून ३ लाख ४३ हजार रुपये भरण्यास भाग पाडले. त्यानंतर त्यांची दुसरी मुलाखत घेण्याचा बहाणा करुन त्यांच्याकडून एम्फ्लॉयमेंट चार्जेस म्हणून आणखी १ लाख २६ हजार रुपये उकळले. त्यानंतर सायबर गुन्हेगारी मुलाखत घेण्यास तसेच पुढील कार्यवाही करण्यास टाळाटाळ केल्यानंतर तक्रारदारांना संशय आल्याने त्यांनी रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये चौकशी केली. त्यानंतर रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये अशा प्रकारची कोणतीही नोकरभरती सुरु नसल्याचे त्यांना समजले. त्यानंतर सदर टोळीने त्यांची फसवणुक केल्याचे त्यांच्या लक्षात आले. या टोळीकडून तक्रारदारांची फसवणुक सुरु असतानाच दुसऱ्या टोळीने देखील तक्रारदारांना इनडीड कॅरियर या कंपनीतुन बोलत असल्याचे भासवून त्यांना हिंदुस्थान युनिलिव्हर लिमीटेड कंपनीमध्ये सिनीयर मॅनेजरची नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देऊन त्यांच्याकडून त्याच पद्धतीने प्रोसेस फी (२ लाख ६५ हजार), मुलाखतीसाठी (३ लाख १६ हजार) अशी एकुण ५ लाख ८१ हजार रुपये ऑनलाईन पाठविण्यास भाग पाडून त्यांची फसवणुक केली. या टोळीने देखील दुसरी मुलाखत घेण्यास टाळाटाळ करण्यात आल्यानंतर या टोळीकडून देखील त्यांची फसवणुक होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. अशा पद्धतीने या दोन्ही टोळ्यांनी तक्रारदारांची तब्बल १० लाख ५८ हजार रुपये उकळल्यानंतर त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# संक्षिप्त...

## वृध्दाश्रमातील आजीबाईंच्या हृदयस्पर्शी संवादाने आगळा वेगळा महिला दिन साजरा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

जागतिक महिला दिना निमीत्त माणगांवच्या महिला मंडळाने बोरवाडी येथिल माऊली वृध्दाश्रमास भेट देऊन तिथे जाऊन फळं व बिस्किटपुडे भेट म्हणुन दिले, परंतु कोरोनाचे संकट असल्याने येथील संचालकांकडून वृध्दांच्या आरोग्य व सुरक्षेच्या कारणास्तव वृध्दांशी प्रत्यक्ष भेटणे नाकारण्यात आले. तरीसुध्दा नाराज न होता महिला मंडळाच्या अपर्णा तिगडे, भारती अंबुर्ले, सुरेखा उभारे, भारती म्हात्रे, अंजना कटरे, शुभांगी सुर्वे, सुशीला वाढवळ, कमल पवार, जयश्री मराठे, विद्या सतेरे, निलीमा मजिद हाजीते, स्वाती पवार, सोनिका पवार या महिलांनी कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करीत वृध्दाश्रम येथील विठ्ठल रखुमाईचे मंदिरात जाऊन दर्शन घेत आगळा वेगळा महिला दिन साजरा केला. नेमके याचवेळी वृध्दाश्रमातील दोन आजी बाई त्याच ठिकाणी आल्याने त्यांच्याशी स्नेहपूर्ण संवाद साधता आला. आजीबाईंनी आपले वृध्दाश्रमातील तसेच कौटुंबिक जीवनातील हृदयस्पर्शी अनुभव या महिला मंडळ सदस्यां सोबत कथन केले. यापैकी एक ८८ वर्षाच्या कर्जत येथील आजीबाई गेली सतरा वर्षे या वृध्दाश्रमात राहतात. जीवन काय असते ? हे त्यांचेशी संवाद साधताच आंम्हाला कळले. तर दुसऱ्या पुणे येथील आजी बाईंनी त्यांच्या खास शैलीत मंदिरात भजन गाऊन या वयात ही कसे जगावे ! जणु हेच सांगत एक नविन उर्जा तसेच उतारवयात एकाकी जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन मिळाला. कुणीतरी आपल्या जवळचे आस्थेने विचारपूस करीत आपल्याला भेटायला आल्यामुळे अवर्णनिय आनंद झाल्याने आजी बाईंच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान पाहुन जागतिक महिला दिन खऱ्या अर्थाने आगळा वेगळा साजरा करता आल्याचे, महिला मंडळाच्या वतिने अपर्णा तिगडे यांनी वार्ताहरा जवळ बोलताना आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.



# नागोठण्यात दोन दुकानांमधून २३३० रुपयांचा गुटखा जप्त

**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठण्यातील खुमाचा नाका परिसर व छ. शिवाजी महाराज चौक परिसरातील दोन दुकानांतून सुमारे २ हजार, ३३० रूपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या पेण कार्यालयातील अन्नसुरक्षा अधिकारी बाबाजी शिंदे यांच्याकडून नागोठणे पोलिस ठाण्याच्या सहकार्याने सोमवारी (दि.८) ही कारवाई करण्यात आली.

यासंदर्भात नागोठणे पोलीस ठाण्यातुन उपलब्ध झालेल्या माहितीनुसार सोमवार ८ मार्च, २०२१ रोजी दुपारी ३ वा. च्या सुमारास या गुन्ह्यातील सहभागी असलेल्या नागोठण्यातील दोन आरोपींनी वर उल्लेख केलेल्या जागेतील आपल्या दुकानात विमल गुटखा विक्रीसाठी ठेवल्याचे दिसून आले.

प्रतिबंधीत अन्नपदार्थ असलेला व गुटखा पानमसाला सुगंधित तंबाखु व स्वादिष्ट सुगंधित सुपारी खाल्लाने घातक परीणाम होवुन जिवीतास धोका निर्माण होतो याबाबत माहीती असुनही दोन्ही आरोपींनी सदर प्रतिबंधित अन्नपदार्थांची साठवणुक, पुरवठा, वाहतुक, वितरण व विक्री तसेच उत्पादकाने सदर अन्नपदार्थाचे उत्पादन केले. त्यामुळे सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी रात्री ११.२५ वा. च्या सुमारास अटक करण्यात आली असून गुन्ह्यातील एकूण २ हजार, ३३० रुपये किमतीचा माल पोलिसांनी जप्त केला आहे.

याबाबत नागोठणे ठाणे येथे गु.र.नं.१९/२०२१ अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९५४, अन्नसुरक्षा व मानदे कायदा २००६ चे नियम २०११ चे कलम ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास नागोठणे पोलिस करीत आहेत.

# माणगांव बसस्थानकात बसायचे वांदे वरुन छप्पर ढासळतयं, प्यायला नाही पाणी

## माणगांव एस. टी आगाराची दशकपूर्ती आणि दशा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव बस स्थानकाचे रुपांतर १४ एप्रील २०११ ला डेपो (आगार) मध्ये होऊन दशकपूर्ती झाली तरी सुध्दा बस स्थानकाच्या जीर्ण इमारतीला दरवर्षी मलमपट्टी करून एस. टी. महामंडळ दिवस ढकलत आहे. बस स्थानकात बसायचे वांदे, वरुन छप्पर ढासळतयं, प्यायला नाही पाणी अशी दुर्दशा झाल्याचे चित्र आहे. प्रवाशांसाठी मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध नाहीत. बहुजन हिताय, बहुजन सुखाय या राज्य परिवहनच्या ब्रीद वाक्या प्रमाणे प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी गेल्या वर्षीच २०२० मध्ये रायगडचे खासदार सुनिल तटकरे तसेच पालकमंत्री आदिती तटकरे यांनी राज्य परिवहन मंत्री अनिल परब यांना भेटून रायगड जिल्ह्यातील एस. टी. बसस्थानकां विषयी माहीती देऊन त्यांचे लक्ष वेधले होते.

मुंबई, गोवा, पुणे, तसेच इतर जिल्ह्यांतून विविध पर्यटन स्थळांना भेट द्यायला येथे येणाऱ्या पर्यंटकांची संख्या मोठी असते. लवकरच उन्हाळी सुट्टीचा हंगाम सुरू होणार, पर्यंटकांचा ओघ वाढणार आहे. अशा वेळेलाच माणगांवची बसस्थानक इमारत जुनी झाल्याने तिचा स्लॅब अचानक प्रवाशांच्या अंगावर कोसळत असल्याने, प्रवासी स्थानकात बसायला घाबरतात. दि. ५ मार्च रोजी




स्लॅब तुकड्याचा मलबा प्रवासी बसण्याच्या आवारात पडला. सुदैवाने कोणालाही इजा झाली नाही. परंतु प्रवाशांचा जीव गेल्यावरच एस. टी. महामंडळ जागे होणार का ? असा संतप्त सवाल प्रवासी उपस्थित करतात. स्थानकात बसायला जागा नाही. बुडत्याला काडीचा नव्हे बांबूचा आधार म्हणुन कि काय, स्थानकात जागोजागी बांबू उभे केलेत.

विशेष म्हणजे माणगांव बस स्थानकात पाणपोई आहे पण त्यात साधे पिण्याचे पाणी नाही. प्रवासात एखाद्याला मळमळले उलटी झाली तर चुळ भरायचेही हाल आहेत. येथील पंखेही बंद पडलेल्या अवस्थेत आहेत. स्वच्छतेच नावे कायमची बोंब आहे. स्वच्छता सर्व्हेक्षणाचे फलक नगरपंचायतीने शहरात लावले आहेत, या सार्वजनिक बसस्थानकाचेही सर्व्हेक्षण संबंधितांनी करावे. शहराच्या नावलौकीकास गालबोट लावण्याचे काम दुर्दैवाने या ठिकाणी घडत आहे. साधे नळ कनेक्शन या मध्यवर्ति सार्वजनिक स्थानकात सुरु नसल्याचे लोक बोलतात. याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. बस स्थानकाच्या बाजूला नवीन बांधकाम करुन तिथे नवीन उद्योगधंदे ही चालू झालेत परंतु बस स्थानकाची दुरुस्ती का केली जात नाही ? असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे.

# सेफ्टी झोन संदर्भात केंद्र सरकारला स्मरणपत्र

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरणमधील सेफ्टीझोनचा प्रश्न प्रलंबित आहे. तो निकाली काढावा यासाठी पुन्हा एकदा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्र सरकारला स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. घर व जमीन बचाव समिती तसेच माजी आमदार मनोहर शेठ भोईर अणि समितीचे अध्यक्ष महेश म्हात्रे सरचिटणीस संतोष पवार यांनी सेफ्टी झोन रद्द करण्याच्या प्रश्नाचा सातत्यपूर्ण पाठपुरावा चालू ठेवला होता.

राज्यसरकारने जी नौदलाचे सुरक्षा पाट्ट्या बाबतची दि. १४-८-२०१९ रोजी पाठविलेल्या प्रस्तावावर केंद्रसरकार कडून कोणत्याही प्रकारे निर्णय मिळाला नसल्यामुळे घर व जमिन बचाव समितीने राज्याचे मुख्य सचिव यांचेकडे पत्रव्यवहार करुन तसेच प्रत्यक्ष भेटून या प्रश्ना संदर्भात चर्चा करून हे प्रकरण लावून धरले होते.

सदर प्रकरणाचा पाठपुरावा राज्य सरकारच्या माध्यमातून होणे आवश्यक असल्यामुळे राज्य सरकारच्या माध्यमातून मा. सचिव, संरक्षण मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांच्याकडे स्मरण पत्र पाठविसाठी आग्रह केल्या नंतर हे स्मरण पत्र भूषण गगराणी, प्रधान सचिव, नगर विकास, विभाग यांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात आले आहे.

तसेच या संदर्भात शनिवार दि. ६ मार्च २०२१ रोजी खासदार श्रीरंग बारणे यांना या बाबत संरक्षण मंत्रालय दिल्ली येथे पाठपुरावा करण्या संदर्भात माजी आमदार मनोहर शेठ भोईर आणि घर व बचाव समितीचे सरचिटणीस संतोष पवार यांनी प्रत्यक्ष भेटून सेफ्टी झोन बाधित जनतेच्या वतीने विनंती केली आहे. खासदार श्रीरंग बारणे यांनी पाठपुरावा करून लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

# सुधागड तालुक्यात वंचित बहुजन आघाडी कार्यालयाची स्थापना; अनेक कार्यकर्त्यांचा प्रवेश

**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

सुधागड तालुक्यात परळी येथे वंचित बहुजन आघाडी कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. नुकतेच या कार्यालयाचे उद्घाटन रायगड जिल्हा अध्यक्ष विश्वतेज साळवी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष विश्वतेज साळवी, महासचिव सागर भालेराव, तालुका अध्यक्ष अमित गायकवाड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेक कार्यकर्त्यांनी वंचीत आघाडीत प्रवेश केला. यावेळीगाव तिथे शाखा असा संकल्प तालुका अध्यक्ष अमित गायकवाड यांनी केला.

तसेच येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे प्रतिनिधी निवडून आणणार असल्याचा दावा गायकवाड यांनी केला.

या कार्यक्रमाला रायगड जिल्हा अध्यक्ष विश्वजीत साळवी रायगड जिल्हा महासचिव सागर भालेराव रायगड जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत साळुंखे रायगड जिल्हा सचिव अशोक वाघमारे व नारायण जाधव, जिल्हा नेते मंगेश वाघमारे, युवक अध्यक्ष राहुल गायकवाड सम्यक विद्यार्थी आंदोलन अध्यक्ष स्वप्नील गायकवाड तालुका सचिव आनंद जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पालीत अवैद्य गुटखा विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासनाची बेधडक कारवाई, मुद्देमाल जप्त

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

राज्यात गुटखा खरेदी विक्रीस बंदी असतानाही जिल्ह्यातील अनेक भागात खुलेआम गुटखा विक्री होताना दिसत आहे. पेण येथील कारवाई नंतर सुधागड पालीत अवैद्य गुटखा विक्रेत्यांवर सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय अन्न व औषध प्रशासन मार्फत बेधडक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत यामध्ये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पाली पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार प्रियांका अनंत भंडारकर अन्न सुरक्षा अधिकारी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पाली सुधागड येथील तीन दुकानात (टपरी ) धाड टाकून मुद्देमाल जप्त करीत आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. यातील आरोपीना दि.(१०)बुधवार रोजी अटक करण्यात आली आहे. पालीतील एस टी स्टॅण्ड समोरील शिवकुमार किराणा स्टोअर येथील सुखराम उर्फ शिवकुमार भागवत गुप्ता यांची टपरी वजा दुकानात

१ ) ४८०-०० / - रु सँफॉन ब्लेन्डेड विमल पानमसाला ( जंबो पॅक ) -३२ पाउचेस २ ) ५८-०० / -व्ही -१ टोबॅको किंग पॅक ) -२ ९ पाउचेस - ५३८-०० / - ( एकुण ६१ पाउचेस ) असा माल जप्त करण्यात आला आहे. याबरोबरच रासळ येथील सौ.शालीनी खाडे यांची टपरी वजा दुकानात १ ) ६ ९०-०० / - रु सॅफॉन ब्लेन्डेड विमल पानमसाला ( जंबो पॅक ) -४६ पाउचेस २ ) १०६-०० / -व्ही -१ टोबॅको ( किंग पॅक ) -५३ पाउचेस किं अंदाजे ७ ९६-०० / - ( एकुण ९९ पाउचेस ) असा माल मिळून आला आहे. तसेच पालीतील एसटी स्टॅण्ड समोरील दुकानदार शरद राउत यांची टपरी वजा दुकानात ९००-०० / - रु सॅफॉन ब्लेन्डेड विमल पानमसाला -३ पॅकेट ( प्रत्येक पॅकेटमध्ये ३० पाउचेस ) , २ ) ३००-०० / -व्ही -१ टोबॅको -५ पॅकेट ( प्रत्येक पॅकेटमध्ये ३० पाउचेस ) कि. अंदाजे १२००-०० / - ( एकुण ०८ पॅकेट ) असा माल मिळून आला आहे. यासंदर्भात प्रतिबंधित अन्न पदार्थ गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू व स्वादिष्ट सुगंधी सुपारी खाल्याने शासनाने नेमून दिलेल्या अधिसूचना नुसार नमूद केलेले घातक परिणाम होऊन मानवी जीविताला धोका निर्माण होतो याबाबतची माहिती असूनही गुटखा विक्रीकरिता बाळगले स्थितीत मिळून आल्याने सदरची कारवाई करण्यात आली आहे. यासंदर्भात पाली पोलीस स्थानकात गु र नं २१/२०२१ भा. द. वि. स. क. १८८, २७२, २७३, ३२८ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम ५९, २६, (२)नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती बोराटे करीत आहेत.

# दैनंदिन जीवनातील ताण-तणावाचे व्यवस्थापन विषयावर व्याख्यान संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महिला दिन विशेष सप्ताहनिमित्त जिल्हा सत्र न्यायालय येथील महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना दैनंदिन जीवनातील ताणतणावाचे व्यवस्थापन या विषयावर डॉ.अमोल भुसारे (मानसोपचार तज्ञ) यांनी आज मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती विभा इंगळे या उपस्थित होत्या. तसेच या कार्यक्रमासाठी सर्व कनिष्ठ व वरिष्ठ न्यायाधीश आणि न्यायालयातील कार्यालयीन महिला अधिकारी व कर्मचारी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव श्री. संदीप स्वामी यांनी केले. या कार्यक्रमात एकूण ६५ महिला अधिकारी व कर्मचारी उपस्थित होत्या.


## पाहिजेत

**ठाणे येथील ट्रस्ट/निखिल माखेचा यांचे कार्यालयात कामकाजासाठी पुरुष उमेदवाराची आवश्यकता आहे. उमेदवाराला सरकारी व निमसरकारी, न्यायालयीन कामकाज, सिडको अशा कार्यालयातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य राहील.**

**उमेदवार पनवेल, नवी मुंबई येथे राहणारा असावा व मराठी अवगत असावे. योग्य उमेदवारास वेतन दिले जाईल.**

**संपर्क :**
**१४७, द्वारकादास रतनशी मेन्शन, कलेक्टर ऑफिस जवळ, स्टेशन रोड, ठाणे, पश्चिम**

**संपर्क क्र : ०२२-२५३४१९२९, ९१६७६७९९९०**



महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां.परिसर,**
**मराठी ग्रंथ संग्रहालयाजवळ, स्टेशन रोड,**
**ठाणे (पश्चिम) पिन कोड-४००६०१**

जा.क्र.काअ/ठाविवि/निविदा-१/७९४/सन २०२० दिनांक : ०५/०३/२०२१

**निविदा कामासह ई-निविदा सूचना क्र.४९ सन २०२०-२०२१**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८
२) महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक १९ जानेवारी २०२१

कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां.परिसर, ठाणे (पश्चिम), दूरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील टक्केवारी वर (Percentage Rate) निविदा कामासह ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां.परिसर, ठाणे (पश्चिम), दूरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम रु. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापूर्व बैठक/ठेकेदारांचा वर्ग/इसारा रक्कम/कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Est. No.: OW/ PESD/771/2020-21 Providing 30 KVA DG Set with AMF Panel, cable and switchgear for Nehull Covid Center at District Hospital Alibag, Dist-Raigad | रु.५,४८,२०५/- | दिनांक १२/०३/२०२१ वाजेपासून दिनांक १९/३/२०२१ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग-ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. इसारा रक्कम रु.५,५००/- निविदा शुल्क रु.५००/- अधिक वस्तू व सेवा कर | दिनांक २२/०३/२०२१ सकाळी ११.०० |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) https://mahapwd.com

२) https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

३) कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां.परिसर, ठाणे (पश्चिम), दूरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ कार्यालयातील सुचना फलक.

४) वरील कामांकरिता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक ठेकेदार यांसह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पूर्ण केल्याचा अनुभव आहे जसे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात.

**सही/-**
**(प्र.अ.दोडे)**
**कार्यकारी अभियंता (विद्युत)**
**ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, ठाणे**

क्र.जिमाका/राअ/जाहि/३२०/२०२०-२१